वयाची बंधने झुगारून धावले ८५० धावपटू

फॅब रनर ग्रुप जालना आणि नगर सायकलिंग क्लबचा पुढाकार

जालना, ता. २२ : फॅब रनर ग्रुप जालना आणि नगर सायकलिंग क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (ता. २२) आयोजित जालना रनर्स मॅरेथॉनमध्ये आबालवृद्धांनी सहभाग नोंदवत 'फिट जालना'चा संदेश दिला. या स्पर्धेत एकूण ८५० धावपटूंनी सहभाग नोंदवला

सकाळी साडेसहा वाजता मंठा रोडवरील कल्याणी ग्रीन्स येथे महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, भाजप महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, सभापती संध्या देठे, फॅब रनर ग्रुपचे अर्जुन जगताप, प्रशांत भाले, नगर सायकलिंग क्लबचे अध्यक्ष गौरव फिरोदिया यांनी हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेला सुरवात केली. पुरुषांच्या १० किलोमीटर गटात (१८ ते ३५ वयोगट) शिरीष यादव, चेतन पोकळे, अभिजित मालपाणी यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय, ३६ ते ५० वयोगटात राकेश यादव, प्रशांत राऊत, संतोष गंडाळ यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय आणि तृतीय, ५१ वर्ष व त्यापुढील वयोगटात महेश महाजन, सतीश यादव, सुधीर कुलकर्णी यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला.

महिलांच्या ५ किलोमीटर गटात (१८ ते ३५ वयोगट) पूजा जांगिड, सीमा धांडे, मनीषा भुंबर, ३६ ते ५० वयोगटात तृप्ती मोगल, जयश्री अग्रवाल, मीना सुरवसे, ५१ वर्षांपुढील वयोगटात सविता पाठक, अरविंद नाईक, राजश्री टाचले, पुरुषांच्या ५ किलोमीटर गटात (१८ ते ३५ वयोगट) अजय धानुरे, वैभव हलनोर, विवेक म्हस्के, ३६ ते ५० वयोगटात अर्जुन जाधव, नितीन तोष्णीवाल, डॉ. ज्ञानेश्वर जाधव, ५१ पुढील वयोगटात गणेश दराडे, जयंत केंद्रे, तारकेश्वर तिवारी यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला. यावेळी सर्व विजेत्यांचा वस्तू व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच, जितेंद्र अग्रवाल, मिलिंद खेरूडकर, प्रशांत राऊत, महेश महाजन, सुप्रिया मापारी, कीर्ती काबरा, सुषमा केंद्रे, पंडित सुरुशे, संतोष जाधव आणि कैलास झोळगे यांचा गौरव करण्यात आला. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी फॅब रनर ग्रुपचे अर्जुन जगताप, प्रशांत भाले, कैलास मस्के, कैलास जाधव, डॉ. दिलीप दिवटे, काशिनाथ मोरे, अशोक राठी, भास्कर पवार, विष्णू पाटेकर, नागेश मापारी, डॉ. सतीश शेकडे, धनसिंग सूर्यवंशी, धर्मेश उजवणे, दिनेश अंधेवार, बलराज शिराळे, शिवाजी हिवराळे, मिलिंद वासनिक, किसन जाधव, मनोज कुमकर, दशरथ पडूळ, केसरसिंग राजपूत, संजय अंपळकर, संजय शेजुळ, राजकुंवर श्रीराम, संदीप ढगे, ईश्वर बिल्लोरे, राम हालनोर, संजय काबरा तसेच नगर सायकलिंग क्लबचे गौरव फिरोदिया, नितीन घोरपडे, कैवल्य कुलकर्णी आणि अहिल्यानगरचे आयर्नमॅन रवी पात्रे यांनी पुढाकार घेतला. या स्पर्धेसाठी पोलिस प्रशासनाचे विशेष सहकार्य लाभले.



जालना : शहरात रविवारी आयोजित मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी धावपटू.

तीन गटांत स्पर्धा

■ **ही स्पर्धा १० किमी, ५ किमी आणि ३ किमी अशा तीन गटांत पार पडली. महिलांच्या १० किलोमीटर गटात (१८ ते ३५ वयोगट) सपना सुरडकर (प्रथम), साक्षी खोतकर (द्वितीय), अनामिका दिवटे (तृतीय) ३६ ते ५० वयोगटात विश्रांती गायकवाड, अश्विनी जाधव, अनिता कापरे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय, ५१ वर्ष व त्यापुढील वयोगटात कीर्ती काबरा, डॉ. स्मिता कुलकर्णी, डॉ. स्वाती रवींद्र देशमुख यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला.**



अवतीभवती



अंबड : मत्स्योदरी विद्यालयात बालकलाकार बालनाटिका सादर करताना.

मत्स्योदरी विद्यालयात सादर केली नाटिका

अंबड : शहरातील मत्स्योदरी विद्यालयात पंचसूत्री कार्यक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास व मनोबल, कौशल्य वाढविण्यासाठी विविध बालसभा, नाटिका, एकांकिका, गीतगायन, भाषण, संवाद, चर्चा याचबरोबर काव्यवाचन, वेशभूषा, वैयक्तिक, सामूहिक नृत्य, कलाविष्कार सादर करण्याची संधी उपलब्ध केली जाते. यामुळे विद्यार्थ्यांच्या नेतृत्व गुणाला चालना मिळते. यानिमित्त विद्यार्थ्यांना आपली कला सादर करण्याची संधी मिळत आहे. यासाठी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी असे नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी पुढाकार घेतात.



केदारखेडा : आरटीएसई परीक्षा केंद्रावर पाहणी करताना व्ही.एन. घायाळ.

आरटीएसई परीक्षा केंद्राची केली पाहणी

केदारखेडा : वर्ष २०१२ पासून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेली आरटीएसई ही स्पर्धा परीक्षा यंदाही शांततेत पार पडली. एमपीएससी व यूपीएससीच्या धर्तीवर घेण्यात येणारी ही परीक्षा विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. या परीक्षेमुळे ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना लहान वयातच स्पर्धा परीक्षांचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचा विकास करण्याबरोबरच भविष्यातील मोठ्या स्पर्धा परीक्षांसाठी त्यांना सक्षम बनवण्याचे कार्य आरटीएसई करत आहे. राज्यभरातून दरवर्षी हजारो विद्यार्थी या परीक्षेत सहभागी होत असून, आपली गुणवत्ता सिद्ध करत आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे, आकर्षक पारितोषिके तसेच विशेष मार्गदर्शन देण्यात येते.

निधन



प्रल्हाद एखंडे

अंबड : मार्डी येथील शेतकरी प्रल्हाद नामदेव एखंडे (वय ६०) यांचे शनिवारी (ता. २१) निधन झाले. त्यांच्यावर रविवारी (ता. २२) सकाळी दहा वाजता गावातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, पाच मुली असा मोठा परिवार आहे.



शांताबाई ढोले

जालना : तालुक्यातील जळगाव येथील रहिवासी शांताबाई अंबादास ढोले (वय ९५) यांचे रविवारी (ता.२२) सायंकाळी ६ वाजता निधन झाले. त्यांच्यावर सोमवारी (ता.२३) सकाळी ९ वाजता जळगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. बाबूराव ढोले व प्रल्हाद ढोले यांच्या त्या आई होत.

शिबिरामध्ये ६२ प्रमाणपत्रांचे वाटप

धावडा, ता.२२ : भोकरदन तालुक्यातील धावडा येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाअंतर्गत महसूल समाधान शिबिराचे रविवारी (ता.२२) आयोजन केले होते. यात अनेक प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात आली. तसेच नागरिकांच्या अडचणींचे जागीच निराकरण करण्यासह विविध योजनांतील लाभार्थींना ६० ते ६२ प्रमाणपत्रांचे वाटप केले.

जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर, भोकरदनचे तहसीलदार ज्ञानेश्वर काकडे, तालुका पुरवठा अधिकारी सदानंद नाईक, अंजली कुलकर्णी, पपुलवाड, अविनाश पाटिल, पंचायत समितीचे महेंद्र साबळे, तालुका कृषी अधिकारी अमोल शिंदे, उपाधीक्षक भूमी अभिलेख एल. ई. गोडसमुद्रे, महिला व बालकल्याण विभागाच्या भालके, गटशिक्षणाधिकारी वानखेडे, प्राचार्य गणेश भिका इंगळे, माजी सभापती डॉ.प्रमोद कुलकर्णी, लक्ष्मण मळेकर, सरपंच गंगूबाई बोराडे, उपसरपंच इक्बाल पठाण, सचिन गावंडे, वर्धमान वासकर, समाधान सोनवणे, त्रिबंक गव्हाणे, मधुकर पाटील, संजय वाघ आदींची उपस्थिती होती. दरम्यान, धावडा महसूल मंडळ अधिकारी डी. एम. होरगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राम महसूल अधिकारी किशोर राजपूत, शिवाजी खोकले, अमोल जाधव, प्रतिभा बोडखे, मदन ओफळकर, आशा इंगळे यांनी पुढाकार घेतला.

विद्युत मंडळाचा स्टॉल नसल्याने नाराजी

■ **कार्यक्रमस्थळी विविध विभागांतील स्टॉल होते. पण विद्युत मंडळाचा स्टॉल नसल्याने नागरिकांत नाराजी दिसून आली. विविध शासकीय योजनांची माहिती, अर्ज स्वीकृती, समस्यांचे तत्काळ निराकरण आणि मार्गदर्शनामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.**

एसआयआर मॅपिंगचे कामे गतीने करावीत

नायब तहसीलदार सोनवणे यांच्या सूचना



मोनाली सोनवणे

घनसावंगी, ता.२२ : निवडणूक आयोगाच्या वतीने राज्यात एप्रिलपासून विशेष पुनरावलोकन (एसआयआर) प्रक्रिया सुरू होणार आहे. त्यापूर्वी सुरू असलेले मॅपिंगचे काम त्वरित पूर्ण करण्याच्या सूचना निवडणूक विभागाच्या नायब तहसीलदार मोनाली सोनवणे यांनी केल्या.

सध्या शहर व ग्रामीण भागात एसआयआर मॅपिंगचे काम सुरू आहे. शहरात शिक्षक व कर्मचारी हे बीएलओ म्हणून काम करत आहेत, तर ग्रामीण भागात जिल्हा परिषद शिक्षकांना ही जबाबदारी देण्यात आली आहे. काही शहरी प्रभागांमध्ये खासगी शाळांतील शिक्षकांकडूनही बीएलओचे काम करून घेतले जात आहे. मात्र, काही ठिकाणी बीएलओकडून कामात उदासीनता दिसून येत असून नागरिकांना समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

काही बीएलओ उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने तसेच वाद घालत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. तातडीने योग्य निर्णय घेऊन कामाला गती द्यावी. तसेच कर्तव्यात कसूर करणाऱ्या बीएलओंवर गुन्हे नोंदवून कारवाई करण्यात येईल, असे नायब तहसीलदार मोनाली सोनवणे यांनी सांगितले.

पीक नुकसानीचे पंचनामे करा

जिल्हाध्यक्ष दानवे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

जालना, ता. २२ : जिल्ह्यात झालेल्या गारपीट व अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी भाजप जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

जालना, बदनापूर, मंठा, घनसावंगी या तालुक्यांसह अनेक भागांमध्ये गारपीट व अवकाळी पाऊस झाला. यामुळे कापूस, ज्वारी, हरभरा, गहू, कांदा यांसारख्या प्रमुख पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

तसेच आंबा, डाळिंब, केळी आदी फळबागांनाही फटका बसला असून शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे. अनेक ठिकाणी उभ्या पिके आडवी पडली आहेत. गारपिटीमुळे फळबागांचे नुकसान झाले असून उत्पादनात घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे

वादळी वाऱ्याने सोलर पॅनलचे झाले नुकसान

घनसावंगी : तालुक्यात बुधवारी व गुरुवारी (ता. १८, १९) वादळी वाऱ्यासह झालेली गारपीट व अवकाळी पावसाने ठिकठिकाणी सोलार पॅनलचे नुकसान झाले.

यात देवनगर येथे सुमित्रा मधुकर झाल्टे यांचे चार सोलार पॅनल तर अंतरवाली राठी येथील गजानन केशव सांगळे यांच्या गट क्रमांक शेतामधील दोन सोलार पॅनलचे नुकसान झाले.



अंबड : ज्ञानभूमी महात्मा फुलेनगर येथील कार्यक्रमात भीमराव आंबेडकर यांना मानवंदना देताना समता सैनिक दल.

अंबड शहरात समता सैनिक दलाची रॅली

अंबड, ता. २२ (बातमीदार) : शहरातील ज्ञानभूमी महात्मा फुलेनगर येथे भीमराव आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत समता सैनिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. समता सैनिक दलाच्यावतीने डॉ. आंबेडकर यांची पाचोड नाका येथून रॅली काढण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महात्मा फुलेनगरमधील ज्ञानभूमी बुद्धविहार येथे रॅलीचे आगमन होऊन समता सैनिकांनी भीमराव आंबेडकर यांना मानवंदना देण्यात आली. मेळाव्याचे उद्घाटन व गौतम बुद्धांच्या मूर्तीचा कोनाशिलारंभ आणि भंते राजरत्न थेरो यांनी तयार केलेल्या माया ध्वजाचे भीमराव आंबेडकर यांचे हस्ते अनावरण करण्यात आले. त्यानंतर समता सैनिकांसाठी एकदिवसीय प्रशिक्षण घेण्यात आले. भिक्खू राजरत्न थेरो, लेफ्टनंट कर्नल कुणाल दहिवले, राजाराम बडगे, किशोर जोहरे, अमरसिंग ढाका, महिंद्र बनकर, प्राचार्य मिलिंद पंडित, राजेश सदावर्ते, जिल्हा महिला अध्यक्ष ज्योती खरात, मेजर एकनाथ बोर्डे, मेजर भेजे, राजाभाऊ आठवले, डॉ. राहुल बागूल, बी.डी. पवार, रामदास वाढवे, भीमराव बनसोडे, शिवाजी गाडेकर, डॉ. संदीप लाहोटी, मुक्तराम मगरे, रमेश वाघमारे, शीला मगरे, नगरसेवक शाहूल खरात, चंद्रमणी खरात, अभिजित गरबडे, विनोद जाधव, प्रशांत बागूल, सुनील खरात उपस्थित होते. प्रास्ताविक उत्तमराव येडे यांनी तर सूत्रसंचालन डॉ. डोणगावकर व ज्योती खरात यांनी केले. भास्करराव गाडगे यांनी आभार मानले.

ज्ञानभूमी येथे वाचनालय सुरू करावे : भीमराव आंबेडकर

■ **भीमराव आंबेडकर म्हणाले की, सर्वांनी ज्ञानभूमीला दिलेल्या नावाचे सार्थक करून याठिकाणी वाचनालय सुरू करावे. वाचनाची आवड व गोडी मुलांमध्ये निर्माण झाल्यास भविष्यात त्यांच्यात खऱ्या अर्थाने ज्ञानवृद्धी होण्यास मदत होईल. हा ज्ञानभूमी बुद्धविहार निसर्गरम्य बनविण्यासाठी सर्वांनी पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी वृक्षलागवड व संगोपन करण्यासाठी पुढाकार घ्यावा. येथे भव्य वास्तू निर्माण झाल्यास अनेकांना भविष्यात या ठिकाणाहून प्रेरणा व प्रोत्साहन मिळेल.**

जायकवाडी पाणीपट्टी वसुली मोहीम सुरू

लाभधारक शेतकऱ्यांना पाणीपट्टी भरण्याचे प्रशासनाचे आवाहन

घनसावंगी, ता.२२ : जायकवाडी पाटबंधारे विभाग पैठण अंतर्गत वितरिका क्रमांक २४ ला गोदावरी पाणी वापर संस्था, जलस्मृद्धी पाणी वापर संस्था, मत्स्योदरी पाणी वापर संस्थाचे अध्यक्ष, सचिव, कर्मचारी यांच्या उपस्थितीत शनिवारी (ता. २१) पाणीपट्टी वसुली मोहीम सुरू करण्यात आली.

सर्व लाभधारक शेतकऱ्यांना पाणीपट्टी भरण्याचे आवाहन जायकवाडी प्रशासनाच्यावतीने करण्यात आले. या आवाहनाला शेतकरी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आहेत. शेतीसाठी प्रत्येकाला पाणी मिळणे, वितरिका दुरुस्ती व अनेक अडचणी शासनाकडून सोडून घ्यायच्या असतील तर आपण पाणीपट्टी भरली पाहिजे, असे पाणी वापर संस्था यांच्यावतीने सांगण्यात आले. दरम्यान, पाण्याचे आवर्तन सुरू करण्यात आले आहे.



घनसावंगी : जायकवाडी पाटबंधारे विभाग पैठणअंतर्गत वितरिका क्रमांक २४ ला सोडण्यात आलेल्या पाण्याची पाहणी करताना शेतकरी.

पंजाब नॅशनल बँक भारत सरकारचा उपक्रम | pnb punjab national bank (A Govt. of India Undertaking)

एआरएमबी, नाशिक
शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.bank.in

सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस
(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)

सेक्युरिआयझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्तामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेव्दारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

लॉट क्र.	शाखेचे नाव खात्याचे नाव कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता	मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे	अ) मागणी सूचनाकलम १३(२) प्रमाणे दिनांक ब) थकबाकी रक्कम दि. ३१.१२.२०२५ रोजी क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे अ) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष / रचनात्मक	अ) अनामत रक्कम (रु. लाख) ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख) क) बोली वाढीव रक्कम	लिलावाचे दिनांक व वेळ	कर्जदारांच्या बोझाचा तपशील
१	**शाखा-जालना जिंदाल मार्केट (१३२४१०) कर्जदार - मे. साई ट्रेडर्स प्रोप्रा. श्री अशोक विठ्ठलराव साबळे** पत्ता - घर नं. १८७, इंदेवाडी, अंबड रोड, जालना महाराष्ट्र ४३१ ४०१ **तसेच राहणार** फ्लॅट नं. २०१, चिंतामणी ऑर्चीड, प्लॉट नं. १२५, सिटीएस नं. १६१३२, शिट नं. १८२, ज्योती नगर, औरंगाबाद, महाराष्ट्र ४३१ ००१ **जामीनदार - १. श्रीमती संगिता अशोक साबळे** पत्ता - २४६ बी, नवीन वसाहत, कुंभार पिंपळगाव, ता. घनसावंगी, जालना, महाराष्ट्र ४३१ २११ **तसेच राहणार** फ्लॅट नं. २०१, चिंतामणी ऑर्चीड, प्लॉट नं. १२५, सिटीएस नं. १६१३२, शिट नं. १८२, ज्योती नगर, औरंगाबाद, महाराष्ट्र ४३१ ००१ **२. श्रीमती सिंधुबाई गिरजाअप्पा कलाल,** पत्ता - वालुर, ता. सेलु, जिल्हा परभणी, महाराट्र - ४३१ ५०३	प्लॉट मालमत्ता क्र. २०५७, सर्व्हे नं. २९७ बी (क्षेत्रफळ प्लॉट एरिया २००० स्क्वे.मी.) वालूर-सेलु रोड, वालूर, ता. सेलु, जि. परभणी, संगिता अशोकराव साबळे आणि सिंधुबाई गिरीजाअप्पा कलाल यांच्या मालकीची **चतुःर्सिमा - पुर्व** - सर्व्हे नं. २९७ चा भाग **पश्चिम** - सेलु- बोरी रोड **उत्तर** - वालूर- मोरेगाव रोड **दक्षिण** - अब्दुल कादर यांची जमीन Property ID- **PUNB000828800239**	**अ) २५.११.२०२१ ब) रु. ४८४५५०४.४४/- + इतर व्याज क) १५.०६.२०२२ ड) सांकेतिक ताबा**	**अ) रु. ५२.२७ लाख ब) रु. ५.२२७ लाख (दि. ०७.०४.२०२६) क) रु. १.०० लाख**	**दि. ०७.०४.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत**	**माहित नाही**
२	**शाखा - संभाजीनगर, जालना (777800) कर्जदार - मे. उदय ट्रॅक्टर सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस,** गट नं. 228 आणि 229, जालना-नाव्हा (सिंदखेड राजा) रोड, ताज पेट्रोल पंप जवळ, मौजे नाव्हा, ता.जि. जालना- 431 203. **तसेच राहणार श्री. बाळासाहेब नारायण गजर (प्रोपायटर)** गट नं. 228 आणि 229, जालना-नाव्हा (सिंदखेड राजा) रोड, ताज पेट्रोल पंप जवळ, मौजे नाव्हा, ता.जि. जालना- 431 203. **श्री. बाळासाहेब नारायण गजर (प्रोपायटर) पत्ता - गुंडेवाडी राजुर रोड, ता. जि. जालना- 431 203**	नोंदणीकृत गहाण असलेले गट नं. 228 आणि 229, एकुण एरिया 8850 स्क्वे.मी., जालना- नाव्हा (सिंदखेड राजा) रोड, ताज पेट्रोल पंप जवळ, मौजे नाव्हा, ता.जि. जालना- 431 203. **मालकी हक्क नावे - श्री. बाळासाहेब नारायण गजर, चतुःर्सिमा - पुर्व** - गट नं. 29 मधील शेत जमीन आणि सरकारी रस्ता, **पश्चिम** - हरीभाऊ साळुंके यांची शेत जमीन, **उत्तर** - नाव्हा सिंदखेड राजा रस्ता आणि श्री विष्णु श्रीरसागर यांची गट नं. 229 मधील जमीन आणि इतर, **दक्षिण** - सरकारी रस्ता **प्रोपर्टी आयडी- PUNB4LI57825922**	**अ) २३.०४.२०२४ ब) रु. ३७,६२,३११.६९/- + व्याज आणि इतर खर्च क) २२/०८/२०२४ ड) सांकेतिक ताबा**	**अ) रु. १२३.३६ लाख ब) रु. १२.३३६ लाख (०७.०४.२०२६) क) रु. १.०० लाख**	**दि. ०७.०४.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत**	**माहित नाही**

विक्री ही सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या विहित केलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे
1. मालमत्तेची विक्री जशी आहे तशी आणि जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आहे वर विक्री केली जात आहे.
2. खाली नमूद सुरक्षीत मालमत्तेची माहिती ही अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद केली आहे, परंतू अधिकृत अधिकारी हे त्यामध्ये असलेल्या कोणत्याही तृटीस, चुकीची माहितीस वा काही चुकल्यास उत्तर देण्यास जबाबदार राहणार नाहीत.
3. सदर विक्री ही दिनांक, **07.04.2026** @ सकाळी 11.00 ते संध्या. 4.00 वर **https://baanknet.com** वेबसाईटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मव्दारे खाली दिलेल्या स्वाक्षरीकर्ताव्दारे केली जाईल
4. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी बोलीदाराने राखीव किंमतीपेक्षा किमान एक बोली अनिवार्यपणे सादर करणे आवश्यक आहे.
5. विक्रीच्या तपशीलावर अटी व नियमांसाठी कृपया **www.pnb.bank.in.** आणि **https://baanknet.com** ही वेबसाईट पाहावी

स्वाक्षरी/-
श्री. वेंकेटेश एस.
मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक, (सिक्युअर्ड क्रेडिटर)

दिनांक - २०.०३.२०२६
स्थळ - नाशिक

टीप : स्वैर भाषांतर; तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राह्य